महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार








छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २५० वे | दिनांक : ०६/०९/२०२६ | वार : रविवार


## पेपरफुटीच्या घटनांनंतर राज्य सरकारचा मोठा निर्णय : नोकरभरतीत सुधारणांसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन



**मुंबई** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची औषध निरीक्षक पदाची परीक्षा आणि त्यापूर्वीची 'टीईटी' (TET) परीक्षा पेपरफुटीमुळे रद्द करावी लागल्याने राज्यातील तरुणांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. या वाढत्या घटनांची गंभीर दखल घेत, राज्यातील स्पर्धा परीक्षा आणि नोकरभरती प्रक्रियेत पारदर्शकता आणून आवश्यक सुधारणा करण्यासाठी राज्य शासनाने सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली एका उच्चस्तरीय समितीची स्थापना केली असून, यामध्ये विविध वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील नोकरभरती प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी आणि सध्याच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्यासाठी राज्य शासनाने एका उच्चस्तरीय समितीची स्थापना केली आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती गठीत करण्यात आली असून, यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय नुकताच जारी करण्यात आला आहे.

या सात सदस्यीय समितीमध्ये राज्याचे पोलिस महासंचालक सदानंद दाते, नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, यूपीएससीचे माजी सदस्य एअर मार्शल अजित शंकरराव भोसले आणि आयआयटी मुंबईचे प्रा. श्यामप्रसाद करगड्डे या तज्ज्ञ आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे.

विविध विभागांकडून राबवल्या जाणाऱ्या विद्यमान परीक्षा पद्धतींचे पुनर्विलोकन करून त्यात आवश्यक बदल सुचवण्याचे मुख्य काम ही समिती करेल. भरती प्रक्रिया अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह करण्यासाठी प्रश्नपत्रिका निर्मिती, गोपनीयता, डिजिटल वितरण आणि परीक्षा केंद्रांच्या सुरक्षेवर विशेष भर दिला जाईल. तसेच पेपरफुटी, तोतया उमेदवार, संगनमत आणि इलेक्ट्रॉनिक गैरप्रकार कायमचे रोखण्यासाठी समिती प्रभावी उपाययोजना सुचवणार आहे.

ही समिती राज्यातील प्रत्येक महसुली विभागाला भेट देऊन विद्यार्थी, उमेदवार आणि शैक्षणिक संस्थांच्या प्रतिनिधींशी थेट संवाद साधेल. त्यांच्या मते व सूचनांचा विचार करण्यासोबतच, इतर राज्यांमध्ये आणि परदेशात अवलंबल्या जाणाऱ्या सर्वोत्तम परीक्षा प्रणालींचा अभ्यास करून ही समिती राज्य शासनाला आपला सर्वसमावेशक अंतिम अहवाल सादर करणार आहे.

## केतन अग्रवाल हत्या प्रकरणाला ७९ दिवसांनी मोठं वळण : चेतन चौधरी आणि सिया गोयलच्या मित्राला अटक

**पुणे** : लोहगड किल्ल्यावर केतन अग्रवाल या तरुणाची हत्या केल्याच्या बहुचर्चित प्रकरणाला आता नवं वळण मिळालं आहे. या प्रकरणात पुणे ग्रामीण पोलिसांनी आणखी एका व्यक्तीला अटक केली आहे. रितेश हिंगे असं अटक करण्यात आलेल्या तरुणाचं नाव असून तो मुख्य आरोपी चेतन चौधरी आणि सिया गोयल यांचा वर्गमित्र असल्याची माहिती समोर आली आहे. हत्येच्या कटाची माहिती रितेशला आधीपासून होती, मात्र त्याने याबाबत पोलिसांना माहिती दिली नसल्याचा संशय तपास यंत्रणेला आहे.

केतन अग्रवाल हत्या प्रकरणात यापूर्वी त्याची होणारी पत्नी सिया गोयल आणि तिचा मित्र चेतन चौधरी यांना अटक करण्यात आली होती. आता रितेश हिंगेच्या अटकेमुळे या प्रकरणात आरोपींची संख्या तीन झाली आहे. रितेशला वडगाव मावळ न्यायालयात हजर करण्यात आलं. न्यायालयाने त्याला १२ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.


तपासादरम्यान चेतन चौधरी आणि रितेश हिंगे यांच्यातील व्हॉट्सॲप संभाषण पोलिसांच्या हाती लागल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे, रितेशने हे संभाषण डिलीट केल्याचं सांगितलं जात आहे. मात्र, पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या माध्यमातून डिलीट केलेले चॅट रिकव्हर केले. या संभाषणातून केतनच्या हत्येच्या कटाबाबत रितेशला काही माहिती होती का, याचा तपास पोलिसांनी सुरू केला. पोलिसांच्या तपासानुसार, १८ जून रोजी चेतन आणि सियाने रितेशलाही लोहगडावर सोबत येण्यास सांगितलं होतं. मात्र, रितेशने त्यांच्यासोबत जाण्यास नकार दिला. त्यानंतर लोहगडावर नेमकं काय घडलं, याची माहिती त्याला होती का आणि हत्येनंतर आरोपींशी त्याचा नेमका किती संपर्क होता, याचा तपास आता केला जात आहे. हत्येनंतरही रितेशचा चेतन आणि सियासोबत संपर्क असल्याचं तपासात समोर आल्याची माहिती आहे. त्यामुळे हत्येपूर्वी आणि हत्येनंतर झालेल्या संभाषणांचा तपास पोलिसांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

रितेश हिंगे हा चेतन चौधरी आणि सिया गोयल यांचा वर्गमित्र असल्याची माहिती आहे. तो मूळचा बीड जिल्ह्यातील असून सध्या पुण्यातील बालेवाडी परिसरात एका खासगी कंपनीत काम करत असल्याचं समोर आलं आहे.पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, केतनच्या हत्येच्या कटाबाबत रितेशला काही माहिती होती. मात्र, त्याने हा प्रकार पोलिसांच्या निदर्शनास आणून दिला नाही, असा संशय आहे. याच पार्श्वभूमीवर त्याची चौकशी करण्यात आली आणि त्यानंतर त्याला अटक करण्यात आली. रितेशचा या हत्येत थेट सहभाग होता का, त्याला कटाची नेमकी किती माहिती होती आणि त्याने आरोपींना कोणत्याही प्रकारे मदत केली का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

१८ जून २०२६ रोजी लोहगड किल्ल्यावर केतन अग्रवालची हत्या झाल्याचा आरोप आहे. केतनचं सिया गोयलसोबत लग्न ठरलं होतं. दोघांचा साखरपुडा झाला होता आणि नोव्हेंबरमध्ये त्यांचं लग्न होणार असल्याचं सांगण्यात आलं होतं. मात्र, पोलिसांच्या तपासानुसार सियाचे चेतन चौधरीसोबत प्रेमसंबंध होते. या संबंधात केतन अडथळा ठरत असल्याने त्याला संपवण्याचा कट रचल्याचा आरोप सिया आणि चेतनवर आहे. १८ जून रोजी सियाने केतनला वाढदिवसाच्या निमित्ताने ट्रेकिंगसाठी लोहगडावर नेलं. त्यानंतर चेतनही तिथे पोहोचला. लोहगडावर गेल्यानंतर केतनला कड्यावरून ढकलण्यात आल्याचा पोलिसांचा आरोप आहे. सुरुवातीला हा प्रकार अपघात असल्याचं भासवण्याचा प्रयत्न करण्यात आला. केतनचा पाय घसरल्यामुळे तो दरीत पडल्याचं सांगण्यात आलं. मात्र, पोलिसांच्या तपासात या कथित अपघाताबाबत संशय निर्माण झाला.

लोहगड परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर पोलिसांना महत्त्वाचे धागेदोरे मिळाले. या फुटेजमध्ये चेतन चौधरी दिसून आला. त्यानंतर पोलिसांनी संपूर्ण घटनाक्रमाचा तपास सुरू केला. तपास पुढे गेल्यानंतर सिया आणि चेतन यांच्यावर संशय बळावला आणि दोघांना अटक करण्यात आली. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, चौकशीदरम्यान केतनच्या हत्येमागे त्यांच्या प्रेमसंबंधांचा मुद्दा असल्याचं समोर आलं. सध्या सिया गोयल आणि चेतन चौधरी हे दोघेही न्यायालयीन कोठडीत असून त्यांना येरवडा कारागृहात ठेवण्यात आलं आहे. या प्रकरणाची सुनावणी फास्ट ट्रॅक कोर्टात सुरू असल्याची माहिती आहे.

## ध्वनीप्रदूषणाविरुद्धचा पहिला आवाज : 'जुलमाचे श्रोते' संकल्पना मांडली



**मुंबई** : आजच्या काळात पुण्यामध्ये डीजेच्या भीषण आवाजाविरोधात उठणारा विद्यानंद बापट यांचा आवाज नवीन वाटत असला, तरी या लढ्याची पायाभरणी ८० च्या दशकातच एका द्रष्ट्या डॉक्टरने केली होती—ते नाव म्हणजे डॉ. यशवंत ओक. ज्या काळात मोठा आवाज हाच उत्सवाचा उत्साह मानला जायचा, त्या काळात त्यांनी आवाजाच्या या दहशतीविरुद्ध कायदेशीर आणि वैज्ञानिक लढा पुकारला. देशात आज अस्तित्वात असणारे ध्वनिप्रदूषणाचे कडक नियम आणि शांतता क्षेत्रांची संकल्पना ही त्यांच्याच दूरदृष्टीची फलश्रुती आहे.

डॉ. यशवंत ओक यांच्यासमोर वैद्यकीय क्षेत्रात उच्च पदवी मिळवून परदेशात स्थायिक होण्याचा पर्याय समोर असतानाही, त्यांनी मायदेशी परतत समाजाला घातक ठरणाऱ्या समस्येविरुद्ध आयुष्यभर संघर्ष केला. भारतात ध्वनिप्रदूषणाविरोधात कायदेशीर आणि सामाजिक क्रांती घडवून आणण्यात त्यांचे योगदान ऐतिहासिक मानले जाते.

मुंबई मेडिकल कॉलेजमधून १९६१ मध्ये वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी ब्रिटनची वाट धरली. तेथे अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या 'NHS' (नॅशनल हेल्थ सर्व्हिस) संस्थेत त्यांनी सुमारे ५ वर्षे सेवा बजावली. उच्च शिक्षण आणि विशेष प्रशिक्षण पूर्ण करून १९६७ मध्ये ते भारतात परतले आणि विलेपार्ले येथे त्यांनी स्वतःची प्रॅक्टिस सुरू केली. इंग्लंडहून मायदेशी परतल्यावर डॉ. ओक यांना येथील वाढत्या गोंगाटाची भीषणता जाणवली. त्यांनी या समस्येकडे केवळ एक नागरिक म्हणून न पाहता वैद्यकीय दृष्टिकोनातून पाहिले. केईएम रुग्णालयाचे प्रा. पी. पी. कर्णिक आणि जागतिक पातळीवरील संशोधनांचा आधार घेत त्यांनी हे सिद्ध केले की, कर्कश आवाज केवळ कानांनाच नाही, तर मानवी शरीराला आणि मानसिक आरोग्यालाही गंभीर इजा पोहोचवतो.

डॉ. ओक यांच्या संघर्षाची सुरुवात त्यांच्या राहत्या घराच्या शेजारील औद्योगिक आवाजाविरोधात झाली. १९७९ च्या सुमारास ध्वनिप्रदूषणामुळे मानवी शरीरावर, विशेषतः रक्तदाबावर गंभीर परिणाम होतात, या विषयाकडे त्यांचे लक्ष वेधले गेले. यासंदर्भात एका जर्मन संशोधकाने केलेल्या अभ्यासाचे महत्त्वपूर्ण दस्तऐवज त्यांनी मागवून घेतले. याच काळात त्यांच्या राहत्या घराशेजारील एका औद्योगिक युनिटविरुद्ध त्यांनी लोकवस्तीतील आवाजाच्या त्रासाचे कारण देत तक्रार नोंदवली. या पहिल्याच लढ्यात त्यांना यश आले आणि त्या युनिटचा परवाना रद्द करण्यात आला. त्यानंतर १९८० च्या सुमारास मुंबईत सुरू झालेल्या 'डिस्को दांडिया' आणि मैदानांवरील रात्रभर चालणाऱ्या ध्वनिक्षेपकांच्या त्रासाविरुद्ध त्यांनी नागरिकांना एकत्र केले. 'सोसायटी फॉर क्लीन एन्व्हायर्नमेंट'च्या माध्यमातून त्यांनी माहिती गोळा करून वृत्तपत्रांद्वारे जनजागृती केली. यातून हे स्पष्ट झाले की, हा त्रास काही मोजक्या लोकांचा नसून संपूर्ण समाजाचा आहे.

सार्वजनिक स्तरावर आवाजाची मर्यादा राखली जावी यासाठी डॉ. ओक यांनी १९८५ मध्ये वकील व डॉक्टर मित्रांच्या सहकार्याने न्यायालयात दाद मागितली. सणांच्या काळात, विशेषतः रात्री ११ नंतर वाजणाऱ्या अफाट आवाजाच्या ध्वनिक्षेपकांवर बंदी घालण्याची मागणी त्यांनी या याचिकेद्वारे लावून धरली. न्यायालयाने डॉ. ओक यांच्या मागण्यांची गंभीर दखल घेत निर्णय त्यांच्या बाजूने दिला. पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत आवाजाचे प्रदूषण करणाऱ्यांवर १ लाख रुपयांपर्यंतचा दंड आणि ५ वर्षांच्या कारावासाची कडक तरतूद करण्यात आली. देशात ध्वनिप्रदूषणावर असा कडक कायदा लागू होण्याची ही पहिलीच वेळ होती.

१९८५ मध्ये त्यांनी उच्च न्यायालयात एक मूलभूत प्रश्न उपस्थित केला—"एका नागरिकाला दुसऱ्या नागरिकाच्या आवाजाच्या त्रासापासून राज्य सरकार संरक्षण देऊ शकते का?" या प्रश्नाने न्यायव्यवस्थेलाही विचार करायला लावले. न्यायालयाच्या तज्ज्ञ समित्या आणि डॉ. ओक यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच पुढे जाऊन केंद्र सरकारने २००३ मध्ये सन २००० ची 'ध्वनिप्रदूषण (नियमन आणि नियंत्रण) नियमावली' लागू केली. ध्वनिप्रदूषण नियमावलीत महत्त्वाची दुरुस्ती करण्यात आली.

डॉ. ओक यांनी मांडलेली 'जुलमाचे श्रोते' ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची ठरली. घराजवळ वाजणारा डीजे आणि बंद खिडक्यांमधूनही आत येणारा आवाज हा नागरिकांवर लादलेला असतो; ती त्यांची निवड नसते. यामुळे होणारी चिडचिड, निद्रानाश आणि उच्च रक्तदाब यांसारख्या आजारांकडे लक्ष वेधून त्यांनी न्यायालयाला पटवून दिले की, शांतता ही चैनीची गोष्ट नसून तो प्रत्येक नागरिकाचा मूलभूत आरोग्यविषयक अधिकार आहे.

"मोठा आवाज म्हणजे मोठा उत्सव नव्हे" ही वैचारिक क्रांती घडवून आणणाऱ्या आणि ध्वनिप्रदूषणाला 'सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न' म्हणून मान्यता मिळवून देणाऱ्या डॉ. यशवंत ओक यांचे योगदान आजच्या काळातील ध्वनिविरोधी चळवळींसाठी सदैव दिशादर्शक राहील.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०६ सप्टेंबर २०२६


## शिक्षक दिनी गुरुजनांचा सन्मान; पवित्र पोर्टलद्वारे शिक्षकपदी निवड झालेल्या दोन भगिनींचा गौरव




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : मुरूम भारत शिक्षण संस्था संचलित कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, येथे शिक्षक दिनानिमित्त सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार तसेच पवित्र पोर्टलद्वारे शिक्षकपदी निवड झालेल्या माजी विद्यार्थिनींचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज व भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डी. टी. इंगोले होते.यावेळी माजी प्राचार्य दत्तात्रय इंगळे, माजी प्राचार्य राम जाधव तसेच माजी प्राध्यापक जीवन जाधव, गणपत बेलकोने, दिनकर देशमुख, जवाहर चनशेट्टी, आर. व्ही. जाधव, डी. बी. कांबळे, एस. जी. गायकवाड, अशोक वडतीले आदींचा सन्मान करण्यात आला.तसेच महाविद्यालयाच्या दोन माजी विद्यार्थिनी सख्ख्या बहिणींची पवित्र पोर्टलद्वारे जिल्हा परिषदेत शिक्षक म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. साक्षी बालाजी इंगोले यांची सोलापूर जिल्हा परिषदेत, तर सुषमा बालाजी इंगोले (कवठे) यांची सातारा जिल्हा परिषदेत शिक्षक म्हणून निवड झाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला. प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य गोविंद इंगोले यांनी महाविद्यालयातून विविध क्षेत्रांत यश संपादन केलेल्या माजी विद्यार्थ्यांचा उल्लेख करून विद्यार्थ्यांसमोर त्यांच्या यशोगाथा मांडल्या. तसेच महाविद्यालयाची होत असलेली उत्तरोत्तर प्रगती व शैक्षणिक वाटचालीची माहिती दिली. अध्यक्षीय समारोपात डी. टी. इंगोले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शिक्षण, संस्कार, मेहनत आणि सातत्य यांच्या जोरावर जीवनात यश मिळविण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंद्रजीत चौधरी व बाळासाहेब मोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन मनोज गायकवाड यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिक्षकांना 'एक दिवसाचा आनंद' देत विद्यार्थिनींनी साजरा केला आगळावेगळा शिक्षक दिन




**छत्रपती संभाजीनगर** : डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात 5 सप्टेंबर रोजी पारंपरिक पद्धतीपेक्षा वेगळ्या आणि सृजनशील उपक्रमांनी शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थिनींनी शिक्षकांना 'एक दिवसाचा आनंद' देत त्यांच्या कार्याचा आणि परिश्रमांचा गौरव केला.कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थिनी प्रीती देशमुख हिच्या सुरेल गायनाने झाली. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अन्विता अग्रवाल यांनी सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देत त्यांच्या शैक्षणिक कार्याचे आणि विद्यार्थिनींच्या जडणघडणीत असलेल्या योगदानाचे कौतुक केले.यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्या डॉ. अग्रवाल म्हणाल्या की, विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेपुरते शिकविण्यापेक्षा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होईल, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होईल आणि जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता विकसित होईल, यासाठी शिक्षकांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे.विद्यार्थी संसद समितीच्या डॉ. चक्रनारायण, डॉ. रमा दुधमांडे, मंगल मोरे, माधुरी भावसार, डॉ. सातदिवे, डॉ. उमाळकर आणि अश्विनी शहाणे यांनी विद्यार्थिनींना शिक्षक दिनानिमित्त केवळ परंपरेनुसार एक दिवसासाठी शिक्षक बनविण्याऐवजी काहीतरी नावीन्यपूर्ण आणि सृजनात्मक उपक्रम राबविण्यासाठी प्रोत्साहित केले.या संकल्पनेतून विद्यार्थिनींनी महाविद्यालयातील शिक्षकांचे विविध गट तयार करून त्यांच्यासाठी विविध मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन केले. शिक्षकांनीही विद्यार्थिनींच्या आग्रहाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध खेळांमध्ये सहभाग घेतला. विद्यार्थिनींनी केलेले अचूक नियोजन, शिस्तबद्ध व्यवस्थापन आणि उत्साहपूर्ण सहभाग यामुळे संपूर्ण कार्यक्रमाला आनंदाचे आणि आपुलकीचे वातावरण लाभले.'शिक्षकांना शिकविण्याऐवजी शिक्षकांना आनंद देण्याचा दिवस' या अभिनव संकल्पनेतून साजरा झालेला हा शिक्षक दिन शिक्षक-विद्यार्थिनी यांच्यातील स्नेह, आपुलकी आणि परस्पर आदर अधिक दृढ करणारा ठरला. शिक्षकवृंद तसेच विद्यार्थिनींनी या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचा मनमुराद आनंद घेतला.या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन व आयोजन महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील विद्यार्थिनींच्या सक्रिय सहभाग आणि सहकार्याने यशस्वीपणे पार पडले.

## शिवाजी पब्लिक स्कूल मध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा




**दरेगाव (दरी)** : येथील शिवाजी पब्लिक स्कूल मध्ये शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात आदर्श शिक्षक, माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.शिक्षक दिनाचे औचित्य साधून शाळेतील विद्यार्थ्यांनी शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या भूमिका बजावल्या. यामध्ये निकिता नारायण मालोदे, समृद्धी सोमनाथ मालोदे, दीपाली कृष्णा कापरे, संचिता भागवत, समीक्षा पवार, विठ्ठल त्रिंबक मालोदे, अभिषेक अजिनाथ मालोदे, युवराज संतोष मालोदे, सचिन भाऊसाहेब मालोदे या विद्यार्थ्यांनी शिक्षकाच्या भूमिकेत उत्कृष्ट कामगिरी बजावली. तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून शिक्षकांचे महत्त्व विशद करून शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०६ सप्टेंबर २०२६


## मुलींच्या शिक्षणासाठी अनवाणी धावणाऱ्या रमाबाईंचा जिल्हा प्रशासनाकडून सन्मान



**बीड/अंबाजोगाई :** रमाताईंच्या विजयामागे केवळ स्पर्धा जिंकण्याची इच्छा नव्हती तर मुलींच्या शिक्षणासाठी संघर्ष करण्याची आणि त्यांच्या उज्वल भविष्यासाठी आर्थिक मदत मिळविण्याची प्रबळ प्रेरणा होती. त्यामुळे त्यांचा हा विजय केवळ एका मॅरेथॉन स्पर्धेतील विजय न राहता आईच्या ममतेचा, त्यागाचा, संघर्षाचा आणि मातृत्वाच्या जिद्दीचा विजय ठरला आहे. त्यांच्या या प्रेरणादायी यशाची दखल जिल्हा प्रशासनानेही घेतली आहे. आपल्या मुलींच्या भविष्यासाठी एक आई किती कष्ट सोसू शकते, याचे रमाताई या मूर्तिमंत उदाहरण आहेत. असे भावनिक आणि गौरवास्पद उद्गार जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी काढले. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी दिव्यांक गुप्ता, अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरांगे, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी मनोज घोडे पाटील, उपविभागीय अधिकारी दिपक वजाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महसूल अधिकारी व जिल्हा प्रशासनाच्यावतीने रमाबाई रणवीर यांचा यथोचित सन्मान करत ५० हजार रुपयांची रोख रक्कमेतून मदतीचा हात देण्यात आला. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या पुढाकारातून मदत निधी संकलित करण्यात आला. रमाताईंच्या दोन्ही मुलींच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत भविष्यात शिक्षणासाठी काही अडचण आल्यास आपण त्यांच्या पाठीशी नेहमी खंबीरपणे उभे असल्याची नि:संदिग्ध ग्वाही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिली. जिल्हाधिकारी श्री.जॉन्सन यांच्या या संवेदनशील आणि तत्पर भूमिकेमुळे रमाबाईंच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले. जिल्हा प्रशासनाने वेळेवर दिलेल्या या आर्थिक बळामुळे मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार असल्याची भावनाही रमाबाई रणवीर यांनी यावेळी बोलून दाखविली. अंबाजोगाई येथे भारती शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने अमृत-२ मॅरेथॉन स्पर्धेचे दि.२९ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजन करण्यात आले होते. या मॅरेथॉन स्पर्धेत कौटुंबिक हलाखीची परिस्थिती व मुलींचे शैक्षणिक शुल्क भरावयाचे असल्याने जिद्द मनात बाळगून अनवाणी पायाने धावून मॅरेथॉन स्पर्धेतील विजेत्या ठरलेल्या रमाबाई रणवीर यांच्या पाठीवर जिल्हा प्रशासनाकडून कौतूकाची थाप देण्यात आली.

यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी प्रथमत: मनमोकळेपणाने संवाद साधत रमाबाईंचा यथोचित सन्मान करून त्यांना ५० हजार रुपयांची रोख मदत सुपूर्द करुन आपली संवेदनशीलता दाखवून दिली

## राज्यशास्त्र विद्यार्थी अभ्यास मंडळाची कार्यकारिणी गठित



**भामरागड :** येथील राजे विश्वेश्वर राव कला वाणिज्य महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संतोष डाखरे यांच्या मार्गदर्शनात नुकतीच राज्यशास्त्र विद्यार्थी अभ्यास मंडळाची कार्यकारिणी गठित करण्यात आली. विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढवून त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणे, तसेच उच्च शिक्षण व रोजगाराच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन करणे हा या अभ्यास मंडळाचा प्रमुख उद्देश आहे.अभ्यास मंडळाच्या माध्यमातून नेतृत्व विकास, स्थानिक स्वराज्य संस्थांना भेटी, मतदार जनजागृती, वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा, प्रश्नमंजुषा, चर्चासत्रे, तज्ज्ञ मार्गदर्शन, उद्योजकता विकास कार्यक्रम, आर्थिक साक्षरता अभियान, औद्योगिक भेटी, संशोधन व प्रकल्प सादरीकरण यांसारखे विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.पुढीलप्रमाणे अभ्यास मंडळाची कार्यकारिणी गठित करण्यात आली. अध्यक्ष सोनू मडावी, उपाध्यक्ष इरपा पुंगाटी, सचिव देविका गवारे, सदस्य करण वेळंजे, जिजा परसा, ललिता तेलामी, श्रीनिवास सडमेक, सुमन हेडो, वैशाली मिच्छा यांची निवड करण्यात आली.

यावेळी आयोजित कार्यक्रमाला डॉ. कैलास निखाडे, डॉ. प्रमोद घोनमोडे उपस्थित होते. संचालन सोनू मडावी तर आभार वैशाली मिच्छा हिने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता बंडू बोंडे यांनी परिश्रम घेतले.






## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरा




**उमरगा :** भारत शिक्षण संस्था, उमरगा संचलित श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे वाणिज्य विभागाच्या वतीने शिक्षक दिन मोठ्या उत्साहात व आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती, महान तत्त्वज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि आदर्श शिक्षक डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी 5 सप्टेंबर हा दिवस संपूर्ण देशभरात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. शिक्षकांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या जीवनातील शिक्षकांचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाणिज्य विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. अजित अष्टे होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले उपस्थित होते. तसेच डॉ. खंडू मुरळीकर, डॉ. विजय मुळे, प्रा. पवार, प्रा. विशाल, प्रा. दीपक, प्रा. सुरज सूर्यवंशी, प्रा. सचिन, प्रा. होलगुंडे वर्षा यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. ते म्हणाले की, शिक्षक हा केवळ विद्यार्थ्यांना विषयाचे ज्ञान देणारा घटक नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा देणारा मार्गदर्शक असतो. शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात वाढ होते; मात्र त्या ज्ञानाला संस्कार, नीतिमूल्ये आणि सामाजिक बांधिलकीची जोड मिळाल्यास विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आधुनिक शिक्षण घेत असताना आपल्या संस्कृतीचा, परंपरांचा आणि संस्कारांचा विसर पडू देऊ नये."विद्यार्थ्यांनी आपले संस्कार, नीतिमूल्ये आणि संस्कृती जपत अध्ययन करावे. शिक्षणाचा उपयोग केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी न करता समाज आणि राष्ट्राच्या विकासासाठी करावा," असे आवाहन प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी यावेळी केले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देऊन त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, शिस्त, नेतृत्वगुण आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे कार्य सातत्याने करावे, असेही त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. अजित अष्टे यांनी शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देताना शिक्षक-विद्यार्थी संबंधांचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षकांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानच मिळत नाही, तर जीवनातील विविध आव्हानांना सामोरे जाण्याची प्रेरणा आणि आत्मविश्वास मिळतो. बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी ज्ञान, कौशल्ये आणि मूल्ये यांचा समन्वय साधून आपल्या भवितव्याची वाटचाल करावी, असे त्यांनी सांगितले.यावेळी उपस्थित प्राध्यापकांनीही विद्यार्थ्यांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच सर्वांगीण विकासासाठी केलेल्या योगदानाची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करून शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे आपल्या जीवनाला योग्य दिशा मिळत असल्याचे सांगितले. शिक्षकांचे योगदान हे विद्यार्थ्यांच्या यशामागील महत्त्वाचे कारण असून, शिक्षकांचा आदर करणे ही विद्यार्थ्यांची नैतिक जबाबदारी असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांमध्ये शिक्षक दिनाबाबत उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती आदर व कृतज्ञतेची भावना व्यक्त केली. ज्ञान, संस्कार आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम, जबाबदार आणि संवेदनशील नागरिक घडविण्यात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. सुरज सुरवसे यांनी अतिशय प्रभावीपणे केले. त्यांनी शिक्षक दिनाचा इतिहास, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे शैक्षणिक व सामाजिक योगदान आणि शिक्षकांच्या कार्याचे महत्त्व याविषयी माहिती दिली. शेवटी कु. प्रियंका इंगळे यांनी उपस्थित मान्यवर, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले.शिक्षक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. "ज्ञानासोबत संस्कार आणि मूल्ये आत्मसात करून जबाबदार नागरिक घडविणे" हा संदेश देत कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०६ सप्टेंबर २०२६


# समाजासाठी जगलेला एक संवेदनशील प्रवास



मित्रांनो, सामाजिक क्षेत्रामध्ये मी आलो.रमलो. जगण्यासाठी का होईना घेतलेला वसा बाजूला न सारता त्याच विचाराने मी प्रवाहित झालो. कामाला लागलो. त्याचे मूळ प्रेरणास्त्रोत म्हणजे माझे गुरुजी विश्वनाथ (अण्णा) तोडकर यांच्या जीवनावरती लिहिलेले हे दोन शब्द.माजपरिवर्तनाच्या वाटेवर काही माणसे पदासाठी चालत नाहीत, प्रसिद्धीसाठी धावत नाहीत; ती चालत राहतात कारण त्यांच्या मनात माणसासाठी काहीतरी करण्याची तळमळ असते. अशाच संवेदनशील, समर्पित आणि सामाजिक जाणिवेने भारलेल्या व्यक्तिमत्त्वाचे नाव म्हणजे विश्वनाथ (अण्णा) तोडकर.गेल्या 45 वर्षांपासून सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत अखंडपणे कार्यरत असलेला हा प्रवास म्हणजे संघर्ष, संवेदना, सेवा, जनजागृती आणि माणुसकीचा प्रवास आहे.जाणीवेतून जनजागृतीचा प्रवासजाणीव संघटनेच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विविध भागांत जनजागृती पथनाट्ये, सामाजिक बदला साठी कॅम्पेन आणि लोकजागृतीचे कार्यक्रम राबवून समाजातील ज्वलंत प्रश्न सामान्य माणसापर्यंत पोहोचवण्याचे काम त्यांनी केले.पुस्तकी विचार समाजापर्यंत पोहोचत नाही, तो लोकांच्या भाषेत आणि लोकांच्या जगण्यात उतरला पाहिजे, या भूमिकेतून पथनाट्य आणि जनजागृतीच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक प्रश्नांना आवाज दिला. अंधश्रद्धा, सामाजिक विषमता, महिलांचे प्रश्न, शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि मानवी हक्क अशा विविध विषयांवर जनजागृती करण्याचा त्यांचा प्रयत्न राहिला.संकटाच्या काळात माणुसकीचा हात.दुष्काळ असो, भूकंप असो किंवा कोविडसारखी महामारी असो संकटाच्या काळात अनेकजण सुरक्षित अंतरावर उभे राहतात होते मात्र अण्णा तोडकर यांची भूमिका नेहमीच “संकटात माणसाच्या सोबत उभे राहणे” अशी राहिली.दुष्काळाच्या काळात शेतकरी, कष्टकरी आणि वंचितांच्या वेदना समजून घेत त्यांनी मदतीसाठी पुढाकार घेतला. भूकंपाच्या संकटात मदतीचा हात पुढे केला. कोविड महामारीच्या काळात भीतीचे वातावरण असतानाही गरजू, उपेक्षित आणि अडचणीत असलेल्या कुटुंबांपर्यंत मदत पोहोचविण्याच्या कार्यात ते सक्रिय राहिले.ही केवळ मदत नव्हती; ती संकटग्रस्त माणसाला “तू एकटा नाहीस” अशी दिलेली सामाजिक हाक होती.वडिलांनी पिकवलेल्या धान्यातून दानशूरतेची शिकवणत्यांच्या सामाजिक जीवनातील एक अत्यंत भावस्पर्शी बाजू म्हणजे वडिलांनी शेतात कष्ट करून निर्माण केलेल्या धान्याचा गरजूंना वाटा देण्याची संस्कृती.शेतात घाम गाळून निर्माण झालेले धान्य केवळ आपल्या घरासाठी नसते, तर त्यात समाजाचाही वाटा असतो, ही भावना त्यांच्या मनात रुजली. त्यामुळे दानशूरता त्यांच्या जीवनात केवळ आर्थिक मदत राहिली नाही; ती संस्कारातून आलेली जीवनपद्धती बनली.माणसाच्या भुकेपेक्षा मोठे दुःख कोणते? आणि भुकेल्या माणसाला अन्न देण्यापेक्षा मोठी सेवा कोणती? या साध्या विचारातून त्यांच्या दानशूर वृत्तीचा प्रवाह पुढे चालत राहिला.एकल महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी योगदानधाराशिव जिल्ह्यातील एकल महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी त्यांनी केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे.पतीच्या निधनानंतर किंवा अन्य कारणांमुळे कुटुंबाची जबाबदारी एकट्याने सांभाळणाऱ्या महिलांना केवळ सहानुभूतीची गरज नसते; त्यांना संधी, आर्थिक साधने, प्रशिक्षण आणि स्वावलंबनाची दिशा आवश्यक असते.ही गरज ओळखून एकल महिलांच्या विकासासाठी बचत, स्वयंरोजगार, आर्थिक सक्षमीकरण आणि मायक्रो फायनान्सच्या माध्यमातून आर्थिक संधी निर्माण करण्याच्या प्रयत्नांना त्यांनी पाठबळ दिले. धाराशिव जिल्ह्यात महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाच्या प्रक्रियेला चालना देण्यात त्यांचे योगदान महत्त्वाचे राहिले आहे.स्वयंसेवी कार्यकर्त्यांचा आधारस्तंभ सामाजिक कार्य करणारी संस्था उभी करणे सोपे; परंतु कार्यकर्ते घडवणे ही त्याहून मोठी प्रक्रिया मोठी आहे.स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संस्थांमधील कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देणे, त्यांना मार्गदर्शन करणे, अडचणीच्या काळात पाठबळ देणे आणि निराश झालेल्या कार्यकर्त्यांमध्ये पुन्हा ऊर्जा निर्माण करणे हे त्यांच्या कार्याचे आणखी एक महत्त्वाचे अंग आहे.अनेक कार्यकर्त्यांसाठी ते केवळ मार्गदर्शक नाहीत; ते ऊर्जा देणारे स्वयंसेवक, सहप्रवासी आणि विश्वासाचा आधार म्हणून त्यांनी कार्य केला आहे.लेखक, साहित्यिक आणि विचारांचा प्रवाही प्रवाससामाजिक कार्याबरोबरच त्यांची लेखन आणि साहित्याची नाळही घट्ट आहे. समाजातील वास्तव, माणसांचे प्रश्न, संघर्ष आणि परिवर्तनाची गरज यांचा विचार त्यांच्या लेखनातून आणि वैचारिक भूमिकेतून व्यक्त होत राहतो.लेखक म्हणून विचार मांडणे आणि कार्यकर्ता म्हणून त्या विचारांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे, हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष पैलू आहे.त्यांच्या विचारांमध्ये आक्रमकतेपेक्षा माणुसकी, समता, सामाजिक बांधिलकी आणि परिवर्तनाची आस अधिक जाणवते. कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभे राहणारे व्यक्तिमत्त्वएखाद्या सामाजिक चळवळीची खरी ताकद तिच्या कार्यालयात नसते, ती तिच्या कार्यकर्त्यांमध्ये असते. कार्यकर्ता टिकला, तर चळवळ टिकते. ही जाणीव ठेवून अनेक सामाजिक कार्यकर्त्यांना त्यांनी वेळोवेळी पाठिंबा, मार्गदर्शन आणि प्रोत्साहन दिले.स्वतः प्रकाशझोतात येण्यापेक्षा इतरांच्या कार्याला प्रकाश देण्याची वृत्ती त्यांच्या सामाजिक प्रवासात दिसून येते.आता महाराष्ट्र लोकविकास मंचाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी45 वर्षांच्या या प्रदीर्घ सामाजिक प्रवासानंतर आज महाराष्ट्र लोकविकास मंचाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून ते सामाजिक प्रश्नांवर व्यापक पातळीवर कार्यरत आहेत.दुष्काळ, पाणी, शेती, रोजगार, महिला सक्षमीकरण, सामाजिक न्याय, वंचितांचे प्रश्न आणि स्वयंसेवी क्षेत्राची ताकद यांसारख्या विषयांवर समाजाला एकत्र आणण्याची गरज आहे. या व्यापक भूमिकेतून त्यांच्या अनुभवाचा उपयोग महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीला निश्चितच होऊ शकतो.एक दवबिंदू...45 वर्षांचा प्रवास पाहिला तर तो एखाद्या महासागरासारखा मोठा वाटतो; पण या प्रवासाकडे “एक दवबिंदू” म्हणून पाहण्याची त्यांची वृत्ती अधिक मोठी आहे.दवबिंदू छोटा असतो; पण तो कोरड्या पानाला ताजेपणा देतो.तसाच एखादा मदतीचा हात छोटा असतो; पण तो एखाद्या कुटुंबाला जगण्याची उमेद देऊ शकतो. एखादे पथनाट्य छोट्या गावात होते; पण त्यातून हजारो मनांमध्ये प्रश्न निर्माण होऊ शकतात.

एखाद्या कार्यकर्त्याला दिलेले प्रोत्साहन छोटे वाटते; पण त्यातून आयुष्यभर समाजासाठी काम करणारा कार्यकर्ता घडू शकतो.विश्वनाथ (अण्णा) तोडकर यांचा 45 वर्षांचा प्रवास म्हणजे अशाच असंख्य दवबिंदूंची साठवण आहे.माणुसकीचे, संघर्षाचे, विचारांचे आणि समर्पणाचे.समाज बदलण्यासाठी नेहमी मोठी साधनेच लागतात असे नाही. कधी कधी एका संवेदनशील मनाची, दोन मदतीच्या हातांची आणि एका जिवंत विचाराची गरज असते.आणि म्हणूनच“स्वतःसाठी जगणारी माणसे अनेक असतात; पण इतरांसाठी जगण्यात समाधान मानणारी माणसे समाजाची खरी संपत्ती असतात.”विश्वनाथ (अण्णा) तोडकर यांचा हा 45 वर्षांचा प्रवास त्याच सामाजिक संपत्तीची एक प्रेरणादायी कहाणी आहे.

**चिंतन : भूमिपुत्र वाघ**

# डिजिटल रेडिएशन मापक उपकरणाच्या पेटंटबद्दल डॉ करण सातुरे व श्रीनिवास सेंदर यांचा जेइएस महाविद्यालयात सत्कार.




**जालना (डॉ राजेंद्र सोनवणे) :** जे.ई.एस. महाविद्यालय जालना येथे भौतिकशास्त्र विभागाचे प्रा.डॉ. करणकुमार रामनाथ सातुरे आणि प्रा.श्रीनिवास संदर यांनी विकसित केलेल्या 'डिजिटल रेडिएशन डोस मेजरमेंट इन्स्ट्रुमेंट' (Digital Radiation Dose Measurement Instrument) या उपकरणाला भारत सरकारचे अधिकृत डिझाइन पेटंट प्राप्त झाले आहे. या महत्त्वपूर्ण संशोधनाबद्दल दिनांक ५ सप्टेंबर २०२६ रोजी शिक्षक दिनी या दोघांचा महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सन्मानपत्र , स्मृतीचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला.अणुऊर्जा आणि वैद्यकीय क्षेत्रात किरणोत्सर्गाची (Nuclear Radiation) अचूक आणि सुरक्षित पातळी मोजणे अत्यंत महत्त्वाचे असते. डॉ. करण सातुरे व प्रा. श्रीनिवास संदर यांनी तयार केलेले हे आधुनिक डिजिटल उपकरण किरणोत्सर्गाचा डोस मोजण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.शिक्षक दिनाच्या विशेष समारंभात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गणेश अग्निहोत्री यांनी पेटंट मिळालेले प्राध्यापक व संशोधक तसेच गुणवंत प्राध्यापकांचे उल्लेखनीय शैक्षणिक कार्याबद्दल कौतुक केले, यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा .डॉ. लक्ष्मीकांत शिंदे यांनी केले,यावेळी उपप्राचार्य डॉ. एस.बी. बिक्कड, पर्यवेक्षक प्रा. ज्ञानेश्वर धनवे, डॉ.फुलचंद मोहिते, जे ई एस चे स्टाफ वेल्फर कमिटीचे सर्व सदस्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी केले तर उपस्थिताचे आभार डॉ. बाबासाहेब वाघ यांनी मानलेत.

## राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, करमाड येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा





**करमाड :** भारतीय संस्कृती संवर्धन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, करमाड, ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे भारताचे माजी राष्ट्रपती व महान तत्त्वज्ञ डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिनाचा विशेष कार्यक्रम संपन्न झाला.कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांनी अभिवादन केले. शिक्षक दिनानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत शिक्षकांचा सन्मान व सत्कार केला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला मिळणारी दिशा, ज्ञानाबरोबरच संस्कार, शिस्त,मूल्ये आणि जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन याबद्दल मनोगते देखील व्यक्त केली.कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शिक्षण दिनाच्या शुभेच्छा देऊन शिक्षकांप्रती आपला आदर व्यक्त केला.यावेळी मार्गदर्शन करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.मनोज देवकर यांनी “शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारा मार्गदर्शक असतो,”असे प्रतिपादन केले. “शिक्षक हा भावी पिढीच्या जडणघडणीचा कणा असतो. विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार व योग्य दिशा देऊन त्यांना सक्षम व जबाबदार नागरिक घडविण्यात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे,” असे प्रतिपादन प्रा.डॉ.कालिदास फड यांनी केले. बदलत्या शैक्षणिक परिस्थितीत विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून ज्ञान, कौशल्ये, नैतिक मूल्ये आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल साधावा,असे आवाहन डॉ. नितीन मुळे यांनी केले.

शिक्षक दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयातील सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.आणि या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व प्राध्यापकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## भूमिका बदलल्या, जबाबदाऱ्या कळल्या; इकरा पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी साकारला ‘शिक्षक दिन’






**जळगाव :** इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, मोहाडी, जळगाव येथे शिक्षक दिनानिमित्त अनोख्या व उपक्रमशील पद्धतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी एक दिवसासाठी शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भूमिका स्वीकारून त्यांच्या जबाबदाऱ्या, कामकाज आणि अडचणींचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. विद्यार्थ्यांनी विविध वर्गांमध्ये वेगवेगळ्या विषयांचे अध्यापन करत आत्मविश्वासाने शिक्षकांची भूमिका बजावली. सादिया शेख साजिद यांनी प्राचार्यपदाची जबाबदारी सांभाळली, तर बिलाल, साहिल आणि अलकमा यांनी शिपायांच्या भूमिका पार पाडल्या.अध्यापनात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविण्यासाठी शाळेच्या वतीने ‘बेस्ट टीचर अवॉर्ड’ प्रदान करण्यात आला. उमैर साजिद खान यांनी उत्कृष्ट अध्यापन कौशल्याचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक, अरहम देशपांडे यांनी द्वितीय क्रमांक, तर ताहा सोहेल यांनी तृतीय क्रमांक पटकावला. विद्यार्थ्यांनी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भेटवस्तू देऊन त्यांच्याप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त केली. प्राचार्यांची भूमिका पार पाडणाऱ्या सादिया शेख साजिद यांनी आपल्या मनोगतात प्राचार्यपदाच्या जबाबदाऱ्यांवर प्रकाश टाकत, “प्राचार्यांची खुर्ची ही केवळ पदाची नसून मोठ्या जबाबदाऱ्यांची ‘हॉट चेअर’ आहे,”असे सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ताहा सोहेल यांनी प्रभावीपणे केले.शाफिया तनवीर आणि शीश यांनी शिक्षकांचे महत्त्व व त्यांच्या भूमिकेवर प्रभावी भाषणे केली.अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य शेख शकील यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, शिक्षक केवळ पुस्तकी ज्ञान देत नाहीत,तर विद्यार्थ्यांना योग्य दिशा देऊन त्यांच्या उज्ज्वल भवितव्याची पायाभरणी करतात. विद्यार्थ्यांनी एक दिवस शिक्षकांची भूमिका निभावणे हा त्यांच्या दृष्टीने अनुशासन, नेतृत्व,संयम आणि जबाबदारीची जाणीव करून देणारा उपक्रम असल्याचे त्यांनी नमूद केले.अध्यापन, भाषणे, शिक्षकांचा सन्मान आणि विविध उपक्रमांनी रंगलेल्या या शिक्षक दिनाच्या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या कार्याची आणि जबाबदारीची प्रत्यक्ष अनुभूती मिळाली.उत्साहपूर्ण वातावरणात हा कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०६ सप्टेंबर २०२६

# राजे उमाजी नाईक : स्वराज्याची ज्वाला

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा केवळ काही मोजक्या राजकीय नेत्यांच्या कार्याचा इतिहास नाही. या इतिहासाच्या पाठीशी असंख्य ज्ञात-अज्ञात व्यक्ती, समाजघटक, कष्टकरी आणि वंचित जनसमुदायांच्या त्यागाची, संघर्षाची आणि स्वाभिमानाची परंपरा उभी आहे. परकीय सत्तेविरुद्धचा असंतोष देशाच्या कानाकोपऱ्यात वेगवेगळ्या स्वरूपात व्यक्त होत होता. महाराष्ट्राच्या भूमीतही ब्रिटिश सत्तेच्या विस्ताराला प्रारंभीच विरोध करणाऱ्या अनेक धाडसी व्यक्तींनी आपल्या परीने प्रतिकार उभारला. या आरंभीच्या ब्रिटिशविरोधी संघर्षातील एक महत्त्वाचे आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणजे राजे उमाजी नाईक. 7 सप्टेंबर हा त्यांचा जयंतीदिन. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करणे म्हणजे केवळ एका शूर व्यक्तीला अभिवादन करणे नव्हे, तर स्वाभिमान, स्वराज्य, अन्यायाविरुद्धचा प्रतिकार आणि सामान्य माणसाच्या हक्कांसाठी उभे राहण्याच्या मूल्यांचे स्मरण करणे होय.राजे उमाजी नाईक यांचा जन्म 7 सप्टेंबर 1791 रोजी पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील भिवडी (पुरंदर किल्ला) येथे झाला. त्यांचे वडील दादाजी खोमणे हे पुरंदर किल्ल्याच्या रखवालदारीशी संबंधित होते. त्या काळात रामोशी समाजातील अनेक कुटुंबांवर किल्ल्यांची राखण, रात्रीची गस्त, पहारा आणि सुरक्षा यांसारख्या जबाबदाऱ्या सोपविल्या जात. या पारंपरिक कामामुळे या समाजातील लोकांमध्ये धैर्य, शारीरिक कणखरपणा, संकटांचा सामना करण्याची क्षमता आणि परिसराची सूक्ष्म माहिती असण्याचे कौशल्य विकसित झाले होते. उमाजी नाईक यांचे बालपणही अशाच वातावरणात गेले. तलवार, भाला, कुऱ्हाड, धनुष्यबाण, गोफण आणि दांडपट्टा यांसारख्या शस्त्रांच्या वापराचे त्यांनी शिक्षण घेतले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात साहसाबरोबरच परिस्थितीचा अंदाज घेण्याची आणि योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची क्षमता विकसित झाली.उमाजी नाईक यांच्या आयुष्याला निर्णायक वळण देणारी परिस्थिती ब्रिटिश सत्तेच्या विस्तारामुळे निर्माण झाली. ईस्ट इंडिया कंपनीने महाराष्ट्रातील राजकीय आणि प्रशासकीय वर्चस्व वाढविल्यानंतर पारंपरिक सत्ताकेंद्रे आणि स्थानिक व्यवस्था विस्कळीत होऊ लागल्या. अनेक समाजघटकांचे पारंपरिक अधिकार आणि उपजीविकेची साधने हिरावली जाऊ लागली. रामोशी समाजालाही या बदलाचा मोठा फटका बसला. पुरंदर किल्ल्याच्या रखवालदारीसारख्या पारंपरिक जबाबदाऱ्यांपासून त्यांना दूर करण्याचे प्रयत्न झाले. वतने, जमिनी आणि पारंपरिक अधिकारांवर मर्यादा येऊ लागल्या. त्यामुळे केवळ आर्थिक प्रश्न निर्माण झाला नाही, तर समाजाच्या स्वाभिमानालाही धक्का बसला. आपल्या पूर्वजांपासून चालत आलेल्या जबाबदाऱ्या आणि अधिकार अचानक परकीय सत्तेच्या निर्णयामुळे संपुष्टात येत असल्याची भावना उमाजी नाईक यांच्या मनात तीव्र झाली.या परिस्थितीत उमाजी नाईकांनी अन्याय स्वीकारण्याऐवजी प्रतिकाराचा मार्ग स्वीकारला. त्यांच्या नेतृत्वाखाली रामोशी समाजातील अनेक लोक एकत्र आले. मात्र त्यांचा संघर्ष केवळ एका समाजाच्या तक्रारींपुरता मर्यादित राहिला नाही. स्थानिक जनतेवर होणारे आर्थिक शोषण, अन्याय आणि अधिकारशाली घटकांकडून होणारी पिळवणूक यांच्याविरुद्धही त्यांनी आवाज उठविला. सावकार, जमीनदार आणि सामान्य जनतेचे शोषण करणाऱ्या घटकांविषयी त्यांचा रोष होता. त्यामुळे त्यांच्या संघर्षामध्ये राजकीय स्वातंत्र्याबरोबरच सामाजिक आणि आर्थिक न्यायाची आकांक्षाही दिसून येते. तत्कालीन ग्रामीण समाजातील विषमता आणि असुरक्षितता लक्षात घेतल्यास उमाजी नाईकांच्या नेतृत्वामागे सामान्य लोकांच्या असंतोषाची मोठी पार्श्वभूमी होती.उमाजी नाईकांचे सर्वांत प्रभावी सामर्थ्य म्हणजे त्यांचे संघटनकौशल्य. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना केवळ शस्त्रे हाताळण्याचे प्रशिक्षण दिले नाही, तर परिस्थितीनुसार हालचाल करण्याची, गुप्त माहिती मिळविण्याची आणि ब्रिटिशांच्या सैन्यव्यवस्थेला चकवा देण्याची पद्धत विकसित केली. डोंगर-दऱ्या, जंगल, घाटवाटा आणि दुर्गम प्रदेश यांची त्यांना चांगली माहिती होती. या भौगोलिक ज्ञानाचा त्यांनी प्रभावी उपयोग केला. ब्रिटिश सैन्याची संख्या आणि साधने अधिक असतानाही स्थानिक परिस्थितीचा लाभ घेऊन उमाजी नाईकांच्या सहकाऱ्यांनी त्यांना अनेकदा अडचणीत आणले. अचानक हल्ला करून माघार घेणे, शत्रूच्या हालचालींवर लक्ष ठेवणे आणि सुरक्षित ठिकाणी आश्रय घेणे या छापामार पद्धती त्यांच्या संघर्षाचे वैशिष्ट्य ठरल्या.त्यांच्या या संघर्षात अनेक सहकाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. उमाजी नाईकांचे नेतृत्व वैयक्तिक शौर्यावर आधारित असले तरी त्यामागे संघटित लोकशक्ती होती. हीच त्यांच्या चळवळीची खरी ताकद होती. ब्रिटिशांच्या आधुनिक सैनिकी यंत्रणेसमोर स्थानिक लोकांच्या सहकार्याने उभा केलेला हा प्रतिकार त्या काळच्या परिस्थितीत अत्यंत धाडसी होता. त्यांच्या हालचालींमुळे ब्रिटिश प्रशासनाला मोठी चिंता निर्माण झाली. एका विशिष्ट प्रदेशापुरता मर्यादित न राहता हा असंतोष व्यापक होऊ शकतो, याची जाणीव ब्रिटिशांना झाली होती.उमाजी नाईकांच्या संघर्षातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे स्वराज्याची त्यांची कल्पना. त्यांनी स्वतःला ‘राजे’ म्हणून संबोधले आणि ब्रिटिशांच्या प्रशासकीय सत्तेला पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. काही ठिकाणी त्यांनी न्यायनिवाड्याची व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न केला. 1827 मध्ये त्यांच्या जाहीर आवाहनातून ब्रिटिशांच्या महसूलव्यवस्थेला सहकार्य न करण्याचा आणि परकीय सत्तेविरुद्ध उभे राहण्याचा संदेश देण्यात आला. ही भूमिका त्या काळातील परिस्थितीत अत्यंत धाडसी होती. ब्रिटिश सत्ता हळूहळू आपले प्रशासकीय जाळे मजबूत करत असताना तिच्या महसूलव्यवस्थेला विरोध करणे म्हणजे त्यांच्या शासनव्यवस्थेच्या मुळालाच आव्हान देणे होते.1831 मधील उमाजी नाईकांचा जाहीरनामा त्यांच्या राजकीय विचारांच्या व्यापकतेचे महत्त्वपूर्ण उदाहरण मानला जातो. या आवाहनातून ब्रिटिश सत्तेविरुद्ध व्यापक प्रतिकार उभारण्याची भूमिका स्पष्ट होते. ब्रिटिशांना महसूल देऊ नये, त्यांच्या सत्तेला सहकार्य करू नये आणि आपल्या भूमीच्या स्वाधिकारासाठी संघर्ष करावा, असा त्यामागील संदेश होता. विशेष म्हणजे या आवाहनाचा विस्तार एका समाजापुरता किंवा एका गावापुरता मर्यादित नव्हता. हिंदुस्थानातील विविध घटकांनी एकत्र येऊन परकीय सत्तेविरुद्ध उभे राहावे, अशी त्यांची भूमिका होती. आधुनिक राष्ट्रवादाची संकल्पना त्या काळात आजच्या अर्थाने विकसित झालेली नसली तरी परकीय सत्तेविरुद्ध व्यापक जनप्रतिरोधाची कल्पना त्यांच्या विचारांमध्ये दिसून येते. म्हणूनच उमाजी नाईकांच्या कार्याचा अभ्यास केवळ स्थानिक बंड किंवा उठाव म्हणून न करता भारतीय स्वातंत्र्याच्या आरंभीच्या प्रतिकारपरंपरेच्या संदर्भात करणे आवश्यक ठरते.उमाजी नाईकांच्या जीवनात संघर्षाबरोबरच चढ-उतारही आले. काही काळ त्यांनी ब्रिटिशांशी तडजोड केली आणि आत्मसमर्पण केले. त्यांना ब्रिटिश प्रशासनाकडून काही जबाबदारीही देण्यात आली. पुणे आणि सातारा परिसरातील शांतता राखण्याचे काम त्यांच्याकडे सोपविण्यात आले होते. परंतु ब्रिटिश प्रशासन आणि उमाजी नाईक यांच्यातील मूलभूत अविश्वास दूर झाला नाही. त्यांच्या हालचालींविषयी पुन्हा संशय निर्माण झाला आणि ब्रिटिशांनी त्यांच्यावर लक्ष केंद्रित केले. यावरून त्यांच्या जीवनातील संघर्ष हा एका सरळ रेषेत चाललेला नव्हता, तर तत्कालीन राजकीय परिस्थिती, स्थानिक संबंध आणि ब्रिटिश धोरणे यांच्याशी सतत झुंज देत पुढे गेलेला होता.ब्रिटिश प्रशासनाने उमाजी नाईकांना पकडण्यासाठी अनेक प्रयत्न केले. त्यांच्याविषयी माहिती मिळविण्यासाठी स्थानिक पातळीवर जाळे निर्माण करण्यात आले. अखेरीस 8 ऑगस्ट 1831 रोजी त्यांच्या पकडीसाठी दहा हजार रुपयांचे मोठे बक्षीस आणि चारशे बिघे जमीन देण्याची घोषणा करण्यात आली. या घोषणेवरून उमाजी नाईक ब्रिटिश प्रशासनासाठी किती मोठे आव्हान ठरले होते, याची कल्पना येते. दीर्घकाळ त्यांचा शोध घेतल्यानंतर विश्वासघातामुळे त्यांना पकडण्यात ब्रिटिशांना यश आले. 15 डिसेंबर 1831 रोजी उमाजी नाईक ब्रिटिशांच्या ताब्यात आले. त्यानंतर त्यांच्यावर खटला चालविण्यात आला आणि त्यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली.3 फेब्रुवारी 1832 रोजी पुण्यात उमाजी नाईकांना फाशी देण्यात आली. एका तरुण वयात सुरू झालेला त्यांचा संघर्ष अशा प्रकारे संपला; परंतु त्यांच्या बलिदानाने निर्माण केलेली प्रेरणा संपली नाही. उलट त्यांच्या मृत्यूनंतरही ब्रिटिशविरोधी प्रतिकाराच्या इतिहासात त्यांचे नाव कायम राहिले. 1857 च्या व्यापक उठावापूर्वीच भारताच्या विविध भागांत परकीय सत्तेविरुद्ध असंतोष आणि प्रतिकाराची विविध रूपे दिसत होती. महाराष्ट्रातील या आरंभीच्या प्रतिकारपरंपरेत उमाजी नाईकांचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यांच्या जीवनातून हे स्पष्ट होते की स्वातंत्र्याची आकांक्षा केवळ उच्चभ्रू किंवा राजकीय नेतृत्वापुरती मर्यादित नव्हती; ती सामान्य लोकांच्या मनातही खोलवर रुजलेली होती.उमाजी नाईकांच्या इतिहासाचा विचार करताना वंचित आणि उपेक्षित समाजघटकांच्या योगदानाचा प्रश्नही महत्त्वाचा ठरतो. इतिहासलेखनामध्ये अनेकदा राजे, सरदार, युद्धे आणि मोठ्या राजकीय घटनांना केंद्रस्थानी ठेवले जाते. मात्र त्या घटनांच्या पाठीमागे सामान्य जनतेचे योगदान, स्थानिक उठाव आणि सामाजिक संघर्ष दडलेले असतात. उमाजी नाईकांचा इतिहास या दुर्लक्षित बाजूकडे आपले लक्ष वेधतो. एका पारंपरिक व्यवसायावर आणि जीवनपद्धतीवर अवलंबून असलेल्या समाजघटकाने परकीय सत्तेच्या हस्तक्षेपाला दिलेला प्रतिकार हा सामाजिक इतिहासाचा महत्त्वपूर्ण भाग आहे. म्हणूनच त्यांच्या कार्याचे मूल्यमापन केवळ शौर्यकथेच्या चौकटीत न करता सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संदर्भात केले पाहिजे.आज आपण लोकशाही आणि संविधानाच्या आधारावर चालणाऱ्या भारतात जगत आहोत. त्यामुळे उमाजी नाईकांच्या संघर्षाचा अर्थ त्यांच्या काळातील सशस्त्र प्रतिकाराची पुनरावृत्ती असा घेणे योग्य ठरणार नाही. त्यांच्या जीवनातून आजच्या समाजाने घ्यायचा संदेश वेगळा आहे. अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे, आपल्या अधिकारांची जाणीव ठेवणे, शोषित आणि दुर्बल घटकांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहणे आणि लोकशाही मार्गाने परिवर्तन घडवून आणणे ही त्यांच्या स्मृतीची आधुनिक व्याख्या ठरू शकते. आज अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी संविधान, कायदा, न्यायव्यवस्था, प्रसारमाध्यमे, सामाजिक संघटना आणि लोकशाही संस्था आपल्याकडे आहेत. या साधनांचा जबाबदारीने आणि विवेकपूर्ण वापर करणे हीच आधुनिक काळातील संघर्षाची दिशा आहे.उमाजी नाईकांच्या जयंतीचे महत्त्व म्हणूनच केवळ एका ऐतिहासिक व्यक्तीचे स्मरण करण्यापुरते मर्यादित राहता कामा नये. त्यांच्या जीवनातील स्वाभिमान, धैर्य, संघटनशक्ती आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची वृत्ती आजच्या पिढीपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. विशेषतः तरुणांनी इतिहासाकडे केवळ गौरवगाथा म्हणून न पाहता चिकित्सक दृष्टीने पाहिले पाहिजे. कोणत्या सामाजिक परिस्थितीत एखादा संघर्ष निर्माण झाला, त्यामागे कोणते आर्थिक आणि राजकीय घटक होते, सामान्य लोकांची भूमिका काय होती आणि त्या संघर्षातून पुढील समाजाला काय शिकता येते, याचा अभ्यास झाला पाहिजे. अशा अभ्यासातून इतिहास जिवंत होतो आणि वर्तमानाला दिशा देण्याची क्षमता त्याला प्राप्त होते.आजही समाजात आर्थिक विषमता, सामाजिक भेदभाव, संधीतील असमानता, शोषण आणि दुर्बल घटकांच्या अधिकारांचे प्रश्न पूर्णपणे संपलेले नाहीत. विकासाचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे, प्रत्येकाला शिक्षणाची आणि प्रगतीची समान संधी देणे, श्रमाचा सन्मान करणे आणि मानवी प्रतिष्ठेचे संरक्षण करणे ही आधुनिक लोकशाहीची जबाबदारी आहे. उमाजी नाईकांच्या स्मृतीचे खरे सार याच मूल्यांमध्ये आहे. त्यांच्या नावाने कार्यक्रम आयोजित करणे, प्रतिमेला पुष्पहार अर्पण करणे किंवा घोषवाक्ये देणे यापलीकडे जाऊन त्यांच्या संघर्षाचा सामाजिक आशय समजून घेणे गरजेचे आहे. इतिहासातील नायकांच्या स्मृती तेव्हाच अर्थपूर्ण ठरतात, जेव्हा त्या वर्तमानातील समाजनिर्मितीशी जोडल्या जातात.राजे उमाजी नाईक हे महाराष्ट्राच्या इतिहासातील स्वाभिमानाचे आणि प्रतिकाराचे तेजस्वी प्रतीक आहेत. त्यांनी ज्या काळात ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष केला, तो काळ अत्यंत प्रतिकूल होता. साधनांची कमतरता, संघटित ब्रिटिश सैन्य, राजकीय दबाव आणि सततचा पाठलाग या सर्व परिस्थितींमध्ये त्यांनी आपल्या ध्येयाचा पाठपुरावा केला. त्यांच्या जीवनाचा शेवट फाशीच्या दोरीवर झाला; मात्र त्यांचा विचार आणि संघर्षाचा वारसा पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. त्यांच्या जीवनाकडे पाहताना आपल्याला जाणवते की स्वातंत्र्य ही केवळ राजकीय सत्ता हस्तगत करण्याची संकल्पना नसून ती माणसाला सन्मानाने जगण्याचा अधिकार देणारी मूल्यव्यवस्था आहे.7 सप्टेंबरला राजे उमाजी नाईक जयंती साजरी करताना म्हणूनच त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्याबरोबरच समाजातील अन्याय आणि विषमता कमी करण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे. स्वाभिमानाची ज्योत ज्ञानाने अधिक प्रखर करणे, लोकशाही मूल्यांवर विश्वास ठेवणे, दुर्बलांच्या हक्कांसाठी उभे राहणे आणि सामाजिक समतेच्या दिशेने वाटचाल करणे हीच त्यांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल. उमाजी नाईकांनी परकीय सत्तेविरुद्ध पेटविलेली प्रतिकाराची ज्वाला आज संविधानिक मूल्यांच्या प्रकाशात पुढे नेण्याची गरज आहे. त्यांच्या स्मृतीतून धैर्य घ्यावे, त्यांच्या संघर्षातून स्वाभिमान शिकावा आणि त्यांच्या जीवनातून न्याय्य समाजनिर्मितीची प्रेरणा घ्यावी. इतिहासातील त्यांचे स्थान केवळ भूतकाळात नाही; अन्यायाविरुद्ध जागृत राहणाऱ्या प्रत्येक पिढीच्या वर्तमानात आणि भविष्यातही राजे उमाजी नाईकांची स्वराज्याची हाक निनादत राहील.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
ईमेल — bagate.rajendra५@gmail.com

## देवगिरी कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी स्वयंशासन दिन केला साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे 5 सप्टेंबर 2026 रोजी शिक्षक दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर रवी पाटील उपप्राचार्य गणेश मोहिते उपप्राचार्य अरुण काटे यांच्या हस्ते या शिक्षक दिनाच्या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. सरस्वती पूजन, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमापूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. विद्यार्थ्यांनी पाच सप्टेंबर शिक्षक दिन हा स्वयं शासन दिन म्हणून साजरा केला. विद्यार्थ्यांनी दररोज शिक्षक ज्या भूमिका निभावतात त्या स्वतः आज पार पडल्या. विद्यार्थ्यांनी कॉलेजचे व्यवस्थापन वर्गाचे नियोजन व वर्ग नियमितपणे घेतले, विद्यार्थ्यांनी अध्यापन केले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य पर्यवेक्षक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्व भूमिका विद्यार्थ्यांनी पार पडल्या. महाविद्यालयात हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. दुपारी विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण समारंभ पार पडला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. अरुण काटे होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. विशाल तायडे, प्रमुख उपस्थितीमध्ये पर्यवेक्षक डॉ. किरण पतंगे, डॉ.राजन राजपूत, प्रा.अनघा देशपांडे यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरुवात स्वागतगीताने झाली. यावेळी तृप्ती शिरसाट, साक्षी सुकापुरे आणि दुर्गा निवळ यांनी स्वागतगीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मधुश्री बोडखे यांनी केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले. कृष्णा सुरवसे व भागवत किराळकर यांच्यासह विद्यार्थ्यांनी शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली.प्रमुख अतिथी डॉ. विशाल तायडे यांनी आपल्या मार्गदर्शनातून शिक्षकांचे समाज घडविण्यातील महत्त्व अधोरेखित केले. शिक्षक हे केवळ ज्ञान देणारे नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारे मार्गदर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. तसेच विद्यार्थी-उपप्राचार्य, विद्यार्थी-विभागप्रमुख, विद्यार्थी-सेवक व संबंधित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. सहभागी विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले प्रथम पारितोषिक यशराज इंगळे, द्वितीय पारितोषिक गौरव शेळके तृतीय पारितोषिक दिव्या शिंदे यांना मिळालेकार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप उपप्राचार्य प्रा. अरुण काटे यांनी केला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मनस्वी मुठे यांनी केले. गायत्री आदमाने व मनस्वी मुटे यांनी सूत्रसंचालन केले.शिक्षकांप्रती आदर, कृतज्ञता आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शिक्षक दिनाचा हा कार्यक्रम संस्मरणीय ठरला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समिती प्रमुख प्रा. बाळासाहेब पवळ,प्रा. चंपालाल कहाटे, डॉ. रमेश शिंदे, प्रा. विजय कुलेकर, प्रा. अनिता आढाव, डॉ. मनीषा नाईक, प्रा. स्वाती चव्हाण, प्रा. अश्विनी कुंभार, प्रा. रूपाली थोरात, प्रा. जिजा शिंदे, प्रा. ओंकार विडेकर, प्रा. शीतल पाटील, प्रा.सरिता जाधव, प्रा. रवींद्र सुरवडे,प्रा. आकांक्षा भोसले प्रा. अंजली पिंपरकर प्राध्यापक अर्चना सूर्यवंशी, प्रा. सुलक्षणा होळकर प्रा. प्रज्ञा कुऱ्हाडे यांनी परिश्रम घेतले


## जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-

२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-

३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-

४. शुभेच्छा जाहिरात ६००/-


## शिक्षक हेच खरे शिल्पकार - तेरणा हायस्कूलमध्ये कृतज्ञतेचा सोहळा



**फुलंब्री :** तेरणा हायस्कूल मध्ये शिक्षक दिन मोठ्या उत्साहात व कृतज्ञतापूर्वक वातावरणात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक के. पी. पवार होते. यावेळी व्यासपीठावर जेष्ठ शिक्षक केशवराव मुंडे, रमेश प्रधान, प्रदीप भाले, रमेश जोशी, भाग्यश्री काळे, माधुरी काटकर, उषा उदगे, सिंधू बोर्डे, दिपाली चांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शिक्षकांबद्दल आदर व कृतज्ञता व्यक्त केली.

विद्यार्थीच खरे शिल्प घडवणारे शिल्पकार शिक्षकच असतात असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शिक्षक भुमिका निभावत अध्यापनाचे कार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रावणी राऊत हिने केले, तर आभार प्रदर्शन ऋतुजा जाधव हिने मानले.

## गुंजोटीत श्रीकृष्ण जन्माष्टमी व शिक्षकदिन साजरा



**उमरगा (नागसेन कांबळे) :** तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात आज राष्ट्रीय सेवा योजना आणि सांस्कृतिक विभागाच्या वतीने श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षक दिन आणि श्रीकृष्ण जन्माच्या अनुषंगाने बोलताना या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या प्रा. डॉ. मेघा जोशी पाठक यांनी आपले समुचित विचार व्यक्त करून शिक्षक म्हणजे विद्यार्थ्यांचा पाठीचा कणा असून विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यात शिक्षकांचा मोलाचा वाटा असायला हवा. अध्यापनाच्या क्षेत्रात सेवा करण्याची संधी मिळणे ही भाग्याची गोष्ट असून गुरू शिष्याची पवित्र परंपरा आपल्याकडे अनादी काळापासून आहे. दोन्ही बाजूने त्याचे पावित्र्य राखणे आजही तितकेच गरजेचे आहे. श्रीकृष्णाच्या जन्माकडे आपण डोळसपणे पाहिले पाहिजे असे सांगून श्रीकृष्णाने केलेल्या उपदेशाचे संचित आपल्याला सतत प्रेरणा देत राहील असे सांगितले. सुरुवातीला प्रमुख उपस्थितांच्या हस्ते श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड,राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. डॉ. भाऊसाहेब उगले हे होते.शिक्षक दिनाचे निमित्त साधून महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकाना शुभेच्छा देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर महाविद्यालयातील प्रशासनातील प्रमुख घटक कार्यालयीन अधीक्षक श्री.सिद्रामप्पा देशमुख आणि त्यांचे सर्व शिक्षकेतर सहयोगी यांचा सन्मान करून एक अनोखी परंपरा जपली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. आर. एन. निगडे यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा. डॉ. भाऊसाहेब उगले यांनी केले. प्राचार्य डॉ.गुलाब राठोड यांच्या अध्यक्षीय समारोपानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०६ सप्टेंबर २०२६


## मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा शाळेत शिक्षक दिन




**जळगाव** : या कार्यक्रमाचे व्यवस्थापन वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांनी केले होते. वर्ग पाचवी ते नववीच्या वर्गात दहावीच्या विद्यार्थ्यांनी अध्यापन अध्यापनाचे कार्य केले . कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक श्री राठोड सर होते. प्रमुख अतिथी चव्हाण सर होते. स्वयंशासन दिनाच्या मुख्याध्यापक कुमारी. समरीन शेख व उपमुख्याध्यापिका. मनीषा उबाळे, यांनी आपली जबाबदारी पार पाडली. याप्रसंगी विद्यार्थी शिक्षक म्हणून राधेश्याम गिरी, संतोष गिरी, कमलेश गायकवाड, यांनी शिकवण्याचे अनुभव मनोगतातून व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी श्री. वाघ सर , सूर्यवंशी सर, पठाण सर, श्रीमती. माळोदे मॅडम, रंधे मॅडम, भारद्वाज मॅडम,भिंगोले मॅडम, चव्हाण मॅडम, शिंदे मॅडम, फुलंब्रीकर मॅडम, कवठेकर मॅडम व श्री. वाघ मामा, साबळे मावशी, भोसले मावशी, यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन कुमारी अस्मिता भारसाकळे हिने केले. तर आभार अश्विनी कुमार कांबळे याने केले.

## शिक्षक : विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याचे शिल्पकार”



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** "शिक्षक दिन " हा दिवस शिक्षकांप्रती आदर करण्याचा एक विशेष दिवस आहे. भारतात दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा केला जातो. हा दिवस महान शिक्षक डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनानिमित्ताने साजरा केला जातो. शिक्षक हा केवळ पुस्तकातील ज्ञान देणारा व्यक्ती नसून समाज कार्यकर्त्याप्रमाणे शिक्षक विद्यार्थ्यांच्या समस्या देखील समजून घेतात. विद्यार्थ्यांना चांगले मार्गदर्शन करतात आणि पुढे जाऊन चांगले नागरिक बनण्यासाठी प्रेरणा देतात. शिक्षक दिन हा दिवस शाळांमध्ये विविध उपक्रमांनी साजरा केला जातो. विद्यार्थी शिक्षकांसाठी भाषणे कविता आणि विविध उपक्रम आयोजित करतात या दिवशी विद्यार्थी आपल्या शिक्षकांचे आभार मानतात व त्यांच्या प्रति प्रेम आणि आदर व्यक्त करतात. शिक्षक विद्यार्थ्यांचे गुणांना ओळखून त्यांना योग्य मार्गदर्शन करतात शिक्षक हे समाजाचे शिल्पकार आहेत त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थी चांगले नागरिक बनतात. म्हणूनच शिक्षक दिन हा प्रत्येकासाठी आपल्या शिक्षकांप्रती आदर व्यक्त करण्याचा सुंदर दिवस आहे. शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या जीवनातील ज्ञानाचे दीपस्तंभ आहे. शिक्षक दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्याचा दिवस नसून शिक्षकांनी दिलेल्या ज्ञानाचा आणि संस्कारांचा आदर करण्याचा दिवस आहे. शिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्कार विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्य साठी सदैव प्रेरणादायी ठरतात.सर्वांना शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!


### प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.


## रक्षाबंधनानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भाजपा नेत्या प्रीतीताई जैस्वाल यांनी बांधली राखी



**हिंगोली :** रक्षाबंधनाच्या पावन पर्वानिमित्त सौ. प्रीतीताई जैस्वाल यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस साहेबांची मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी प्रीतीताईंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांना राखी बांधून रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.भाऊ-बहिणीच्या प्रेम, विश्वास आणि आपुलकीचे नाते अधिक दृढ करणाऱ्या या भावनिक प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांनीही प्रीतीताईंना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या.या सदिच्छा भेटीदरम्यान वसमत विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामे तसेच नागरिकांच्या महत्त्वाच्या प्रश्नांवर मुख्यमंत्री महोदयांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध विषयांकडे मुख्यमंत्री फडणवीस यांचे लक्ष वेधून त्याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली.यावेळी बोलताना सौ. प्रीतीताई जैस्वाल म्हणाल्या, “रक्षाबंधन हा प्रेम, विश्वास आणि संरक्षणाच्या पवित्र नात्याचा सण आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या विकासाला गती मिळत असून, त्याचबरोबर वसमत विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करत राहणार आहे.”वसमत मतदारसंघातील पायाभूत सुविधा, विकासकामे आणि नागरिकांच्या विविध प्रश्नांना प्राधान्य देत शासनाच्या माध्यमातून त्यांची प्रभावीपणे सोडवणूक करण्यासाठी पाठपुरावा सुरू ठेवण्याचा निर्धारही प्रीतीताई जैस्वाल यांनी व्यक्त केला.रक्षाबंधनाच्या निमित्ताने झालेल्या या भेटीत स्नेह, आपुलकी आणि विकासाच्या विषयांची सांगड घालत वसमत मतदारसंघाच्या भविष्यातील विकासासाठी सकारात्मक वातावरण निर्माण झाले.

## कालिकादेवी विद्यालयात, शिक्षक दिन उत्साहात साजरा




**शिरूर :** आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर (का.)जि.बीड येथे डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती,'शिक्षक दिन' म्हणून साजरी करण्यात आली.विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या हस्ते,डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी प्राचार्य केशव भांगे यांनी आपल्या भाषणातून शिक्षक दिनाचे महत्त्व सांगून डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन हे शिक्षक ते कुलगुरू नंतर देशाचे राष्ट्रपती झाले.हा आदर्श आपण घ्यावा,तसेच शिक्षकामुळेच अनेक पिढ्या घडतात, म्हणून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य करतांना सारा-सार व विवेक बुद्धीने केले पाहिजे असे सांगितले.तसेच विद्यार्थी वक्ते कु. भाग्यश्री विघ्ने, तनुष्का ढाकणे समृद्धी तुपे, आराध्या गित्ते,अल्फिया शेख यांनी आपल्या मनोगतातून सर्व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या.यावेळी उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने, उपमुख्याद्यापक सिद्धेश्वर शिंदे, पर्यवेक्षक जनार्दन काळे, विज्ञान प्रमुख,प्रा.संजय काकडे, परीक्षा प्रमुख प्रा.नामदेव तरकसे, प्रा.महारुद्र डोंगरे, प्रा.अशोक इनकर, प्रा.प्रशांत मळेकर, प्रा.संजय आव्हाड, प्रा.बिभिषण घायाळ, प्रा.विश्वास ढाकणे, प्रा.नारायण तांबे, प्रा.महादेव हांगे, प्रा.नारायण घोलप, प्रा.दत्ता गायकवाड, प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा.लक्ष्मण गव्हाणे,प्रा.दत्ता शिंदे, प्रा.रविंद्र संकपाळे, प्रा.अशोक सवासे, प्रा.सुनिल मोरे, प्रा.हनुमंत घायाळ प्रा.शशिकांत जावळे, प्रा.बाळासाहेब खटाणे, प्रा.सविता दराडे, प्रा.रेखा निर्मळ, प्रा.सिमा ढवळे, श्रीमती अनिता लाटे, रविंद्र बडे, आप्पासाहेब कांबळे, विनायक सुरवसे, राजू बडे, जयेंद्र निकम, रवी जोशी, नितीन बहिर,रविंद्र गव्हाणे, सुंदर शिंदे, आदिनाथ काशिद, सुनिल खेडकर, नंदकुमार जाधव, विलास कांबळे, गौतम भोसले, यांची विशेष उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन, डॉ.आत्माराम झिंजुर्डे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.विनोद गलांडे यांनी केले.यावेळी विद्यालयातील सर्व कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०६ सप्टेंबर २०२६


## विद्यार्थ्यांनी अनुभवला शिक्षकांचा व प्रशासनाचा कार्यभार




**छत्रपती संभाजीनगर :** ज्ञानेश्वर विद्यालय बेगमपुरा येथे भारताचे महान शिक्षणतज्ज्ञ व माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त 5 सप्टेंबर शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने शाळेत 'स्वयंशासन दिन' हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना शालेय प्रशासन आणि अध्यापन प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळाली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती संध्या मोरे मॅडम ह्या होत्या.प्रमुख पाहुणे म्हणून स्वयंशासन दिनाच्या मुख्याध्यापिका कु.पूर्वी कासोटे व पर्यवेक्षिका कु.साक्षी श्रीखंडे तसेच विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. संभाजी तांगडे जेष्ठ शिक्षिका श्रीमती मंगल नाईकवाडे,श्री अनिल काकडे यांची मंचावर उपस्थिती होती.विद्यार्थ्यांनी सांभाळला शाळेचा कारभार शिक्षक दिनाच्या निमित्ताने आयोजित स्वयंशासन दिवस हा कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.मुख्याध्यापिका म्हणून पूर्वी कासोटे,पर्यवेक्षिका साक्षी श्रीखंडे तसेच शिक्षकांच्या विविध विद्यार्थ्यांनी भूमिका प्रभावीपणे पार पाडल्या. विद्यार्थ्यांनी केवळ शिक्षकांची भूमिका साकारली नाही, तर शाळेतील दैनंदिन कामकाज, शिस्त, अध्यापन आणि प्रशासन यांची जबाबदारी समजून घेण्याचा प्रयत्न केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, निर्णयक्षमता, जबाबदारीची जाणीव, आत्मविश्वास आणि संघभावना विकसित होण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिकेतून वर्गात उत्कृष्ट अध्यापन करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांकडून तसेच शिक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्वयंशासन दिन हा कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये विद्यालयातील सर्व शिक्षकांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता 9 वी च्या विद्यार्थीनी कु सौंदर्या मालकर व कु.गिताश्री काकडे यांनी केले व आभार प्रदर्शन स्वयंशासन दिनामधील सहभागी शिक्षकांनी केले.जेष्ठ शिक्षिका श्रीमती मंगल नाईकवाडे मॅडम यांना विद्यालया तर्फे आदर्श शिक्षिका पुरस्कार आदरणीय मुख्याध्यापिका श्रीमती संध्या मोरे मॅडम यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला जेष्ठ शिक्षिका श्रीमती नाईकवाडे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना शिक्षक दिनाचे महत्त्व डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या संपूर्ण जीवनावर प्रकाश टाकला. तसेच विद्यार्थ्यांनी स्वयंशासन दिवसातून घेतलेल्या अनुभवाचे महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी शिस्त, जबाबदारी आणि नेतृत्वगुण आत्मसात करून आपल्या भविष्यात त्याचा उपयोग करावा, असे त्यांनी सांगितले.तसेच स्वयंशासन दिनाच्या मुख्याध्यापिका पूर्वी कासोटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा मुख्याध्यापिका श्रीमती संध्या मोरे मॅडम यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिका साकारताना घेतलेल्या अनुभवाचे कौतुक केले. शिक्षकाची भूमिका ही केवळ अध्यापनापुरती मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्याची मोठी जबाबदारी असते.असे सखोल मार्गदर्शन यावेळी करण्यात आले.त्यावेळी सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## माळीवाड्यात डीजेमुक्त मिरवणुकीचा संकल्प



**दौलताबाद (जावेद अहमद) :** ग्रामपंचायत माळीवाडा येथे ' डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करण्याबाबत शनिवारी (दि. 5) विशेष सभेचे आयोजन करण्यात आले. ग्रामपंचायत अधिकारी बी. बी. गव्हाणे यांनी वंदे मातरम् गीताने सभेची सुरुवात केली.विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी प्रशासक ज्योती नंदकिशोर मुळे होत्या. यावेळी दौलताबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन खंडागळे यांच्या हस्ते सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विशेष बैठकीस सुरुवात झाली.पोलीस निरीक्षक खंडागळे यांनी 'एक गाव, एक गणपती' उपक्रमाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. गणेशोत्सवाच्या काळात शासनाने दिलेल्या नियमांचे व सूचनांचे पालन करण्याचे आवाहन त्यांनी केले. गणेशोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांना सामाजिक संदेश देणारे प्रेरणादायी देखावे उभारावेत, तसेच मोटिवेशनल स्पीकरच्या माध्यमातून युवक व नागरिकांना सकारात्मक संदेश देण्याचा उपक्रम राबवावा, असे त्यांनी सांगितले.गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान डीजेचा वापर टाळून पारंपरिक पद्धतीने व शांततेत मिरवणूक काढण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी उपस्थित गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी 'डीजेमुक्त गाव' असा सामूहिक संकल्प केला.सभेस शिवशक्ती गणेश मित्र मंडळ, स्वराज गणेश मित्र मंडळ, मोरया गणेश मित्र मंडळ, शिवशंकर गणेश मित्र मंडळ, श्री गणेश महिला मित्र मंडळ आणि कानिफनाथ गणेश मित्र मंडळ अशा एकूण सहा गणेश मंडळांचे अध्यक्ष व प्रतिनिधी उपस्थित होते.यावेळी उपसरपंच मनेश गाजरे, सदस्य कडू कीर्तिकर, जिजाबाई भगत, मंदाकिनी कडू कीर्तिकर, कृष्णा मुळे, धम्मपाल गायकवाड, कमलबाई अस्वार, प्रवीण बडे, अनिता सुधाकर हेकडे, नितीन वानखेडे, प्रमोद साठे, भानुदास आस्वार यांच्यासह मुख्याध्यापक, ग्राम महसूल अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, वन अधिकारी, अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा स्वयंसेविका, सीआरपी, गटप्रवर्तक, गणेश मंडळांचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..

अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०६ सप्टेंबर २०२६



प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


## माळताच तू गजरा

वेणीत मोगऱ्याचा,
माळताच तू गजरा.
पुन्हा पुन्हा वळतात,
सखी सर्वांच्या नजरा. 1

सखी पुढून जाताच
गंध लावी मना वेड.
पुन्हा पुन्हा मन तिचे,
काढते मनाची छेड. 2

गंध तुझ्या मोगऱ्याचा,
माझ्या मनाला भावले.
तेव्हापासून मन माझे,
तुझ्या मागे मागे धावले. 3

गंध तुझ्या मोगऱ्याचा,
वेड लावले मनाला.
मन नाही थाऱ्यावर,
आता सांगावे कुणाला. 4

मोगऱ्याचा दरवळ,
मला लावतो चटका.
तुझ्यामागे धावतांना,
बसे खिशाला फटका. 5



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# जिल्हा परिषद सदस्य आप्पासाहेब पाटील यांची कंटेकुर शाळेला सदिच्छा भेट



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : जिल्हा परिषद सदस्य आप्पासाहेब पाटील यांनी कंटेकुर येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेला सदिच्छा भेट देऊन शाळेची पाहणी केली. यावेळी शाळेतील शैक्षणिक व भौतिक सुविधांची माहिती घेत गावातील विविध विकासकामांबाबत ग्रामस्थांशी चर्चा करण्यात आली. सर्वप्रथम जिल्हा परिषद सदस्य आप्पासाहेब पाटील यांचा सत्कार शिवाजी जमादार यांच्या हस्ते पुष्पहार घालून करण्यात आला. यावेळी सरपंच विजयाबाई जमादार, आनंद बिराजदार, जागरत शिंदे, विलास कुंभार, अप्पाराव पाटील, दिलीप जमादार, बसवराज पाटील, विनायक शिंदे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.यानंतर आप्पासाहेब पाटील यांनी शिक्षक दिनानिमित्त शाळेतील शिक्षक बांधवाना शुभेच्छा दिल्या .आप्पासाहेब पाटील यांनी शाळेच्या इमारतीची तसेच परिसराची पाहणी केली. शाळेतील आवश्यक दुरुस्ती, संरक्षक भिंत,विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सुविधा आणि शाळेच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या कामांबाबत मुख्याध्यापक व शिक्षकांकडून माहिती घेतली.शाळेच्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी आवश्यक निधी लवकरात लवकर उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयत्न करू, अशी ग्वाही जिल्हा परिषद सदस्य आप्पासाहेब पाटील यांनी यावेळी दिली. तसेच कंटेकुर गावातील विविध समस्या व विकासकामांवरही सकारात्मक चर्चा करण्यात आली.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक पटणे सर, कलशेट्टी सर, सूर्यवंशी सर, नदाफ सर, पाटील मॅडम, शिकारे मॅडम तसेच शाळेतील इतर शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.आप्पासाहेब पाटील यांच्या या भेटीमुळे शाळेच्या दुरुस्तीचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल, अशी अपेक्षा शिक्षक व ग्रामस्थांनी व्यक्त केली.


डॉ. दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित

Reg. No. F-13138 (A)

डायमंड करिअर अकॅडमी

सैन्य व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र

निसर्गरम्य २ एकरच्या भव्य परिसरामध्ये नास्ता, जेवणासह निवासाची प्रशस्त व्यवस्था


प्रत्येक १५ दिवसाला डेमो भरती


यशाची १००% खात्री प्रवेश सुरु

* आमची वैशिष्ट्ये *

- तज्ञ शिक्षकांमार्फत मैदानी तयारी
- लेखी परिक्षेसाठी प्रत्येक विषयाला तज्ञ व अनुभवी शिक्षकवर्ग
- फिजिकलसाठी प्रशस्त मैदानी व्यवस्था
- गेस्ट लेक्चर्स
- प्रत्येक विद्यार्थ्यावर वैयक्तीक लक्ष
- लेक्चरसाठी सुसज्ज हॉल
- सोयीस्कर बॅचेस व निवासी सोय
- माफक फी व हप्त्याने भरण्याची सोय

आपला प्रवेश आजच निश्चित करा.







संचालक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार
(शैक्षणिक क्षेत्रातील २८ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)

रसुलपुरा,जटवाडा रोड, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

9405109103 | 9270322952 | 8999094635


# वाङ्मय मंडळ - विद्यार्थ्यांच्या साहित्यिक कलागुणांचे व्यासपीठ



**उमरगा** : विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवन जगत असताना साहित्याकडे केवळ अभ्यासाचा विषय म्हणून न पाहता जीवन समृद्ध करणारे माध्यम म्हणून पाहावे, असे प्रतिपादन श्री शिवाजी महाविद्यालय रेणापूर येथील मराठी विभाग प्रमुख डॉ. जयद्रथ जाधव यांनी केले.श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे वाङ्मय मंडळाचा उद्घाटन सोहळा उत्साहपूर्ण व साहित्यमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी उद्घाटक म्हणून बोलताना डॉ. जयद्रथ जाधव यांनी सृजनशील व अभिरुची संपन्न साहित्याचे वाचन करावे असे आवाहन केले. वाचनामुळे विचार समृद्ध होतात, लेखनामुळे अभिव्यक्तीला आकार मिळतो आणि साहित्याच्या माध्यमातून समाजजीवनाचे विविध पैलू समजून घेता येतात, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व महाराष्ट्र गीताने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले उपस्थित होते.वाङ्मय मंडळाच्या स्थापनेमागील भूमिका स्पष्ट करताना मंडळाचे चेअरमन डॉ. समाधान पसरकल्ले यांनी, अभ्यासक्रमाबरोबरच अवांतर वाचन, साहित्याचे चिंतन, लेखन आणि प्रभावी अभिव्यक्ती यांना महाविद्यालयीन जीवनात महत्त्वाचे स्थान आहे असे प्रास्ताविकामध्ये स्पष्ट केले.अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासात साहित्यिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी वाङ्मय मंडळाच्या विविध उपक्रमांत उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन आपल्या साहित्यिक प्रतिभेला वाव द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या लोकगीतांच्या भित्तिपत्रकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये कु. साक्षी टाकळे - धनगर गीत, कु. आदिती कांबळे - गवळण, कु. दीक्षा सूर्यवंशी -पोवाडा, कु. श्रावणी जाधव - मंगळागौर गीत, कु. आलिशा कांबळे - ओव्या, कु. पूनम कुंभार - लोकगीते आदी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. विनोद देवरकर, उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले, उपप्राचार्य प्रा. गुंडाजी बापू मोरे, प्रभारी प्राध्यापक डॉ. सुभाष इंगळे, पर्यवेक्षक प्रा. शैलेश महामुनी तसेच वाङ्मय मंडळ समितीचे सदस्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.ए. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी कु. प्रतीक्षा शिंदे हिने केले, तर कु. पूजा हांडे हिने उपस्थित मान्यवर, प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.